# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : Desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक :२/एनजीसी/मुदतठेव/नवीनसंस्था/२०१८-१९/ ८०६

दिनांक : 06 JUN 2018

प्रति,

संचालक/प्राचार्य,

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करण्यास संचालनालयाची मान्यता देण्याबाबत.....

संदर्भ :- उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१८/प्र.क्र.१९५/तांशि-४ दिनांक : ०४.०६.२०१८.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासनाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेच्या अनुषंगाने आपल्या संस्थेस व्यावसायिक पदविका/पदवी/पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे.

तरी, त्या अनुषंगाने आपल्या संस्थेस संचालनालयाची मान्यता देण्यासाठी सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये नमूद केलेल्या बाबींची पुर्तता तात्काळ करण्यात यावी. सदर बाबींची पुर्तता केल्यानंतरच संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये नमूद अटींच्या अधीन राहून सदर व्यावसायिक पदविका/पदवी/पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरु करुन विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रीयेस या संचालनालयाकडून मान्यता देण्यात येईल. तरी संबंधित संस्थांनी विहीत मुदतीत आवश्यक कागदपत्रे सादर करुन संचालनालयाची मान्यता घेण्यात यावी, अन्यथा संबंधीत अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०१८--१९ मधील प्रवेशाबाबत संबंधित संस्थांना काही समस्या उद्भवल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे त्यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या विभागातील उपरोक्त प्रस्ताव सादर केलेल्या सर्व व्यावसायिक पदविका/पदवी/पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2018/ 2742
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 07 JUN 2018

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात दिलेल्या सुचनेनुसार शैक्षणिक वर्ष 2018-19 पासून नवीन संस्था सुरू करण्याकरीता विहीत मुदतीत आवश्यक कागदपत्र तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचेकडे जमा करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर